

अभंग

सकल जीवांचा तूचि अन्नदाता ।
संकटात त्राता स्तुणाविशी ॥
मग का निर्मिशी दुःखांचे डोंगर ।
सोसवेना भार संसाराचा ॥
सकल विश्वाचा तूची ना नियंता ।
दंडी ना उन्मत्त खलाही ॥
दुष्ट दुर्जनांते कासया निर्मिशी ।
दुर्बुद्धी ती देसी काही जीवां ॥
दैत्यांते निर्मुनी साधियले काय ।
मरण उपाय ठेविलासि ॥
धर्म, नीती, द्वंद्वे भेदा भेद सारा ।
व्यर्थ हा पसारा कशासाठी ॥
चालविण्या गाडा सृष्टिचा केवळ ।
केला तू हा खेळ विपरीत ॥
एकाच जन्माते जड झाले जीणे ।
अनंत मरणे झेलू कैसे ॥
जैसि ज्याची मोडी तैसे तत्त्वज्ञान ।
मांडिले दुकान भडकुंज्यांनी ॥
एकलव्यापरी करिता साधना ।
अंगुष्ठ दक्षिणा । द्यावी लागे ॥
निबीड काननी शोधितो ती वाट ।
तम घनदाट वारू कैसा ॥
होवुनिया दीप दावी तो प्रकाश ।
शंकांचा निरास करावया ॥
तव अस्तित्वाचे दावी प्रत्यंतर ।
विनवी 'प्रभाकर' जीवेंभावें ॥

— प्रभाकर गोविंद गोगटे

Sundaram FOR EDUCATIONAL USE